MHAU080025332022

<u>**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ५८१/२०२२ मधील निशाणी क्र. ०९ वरील आदेश**</u>

*(उजमा व इतर वि. सय्यद इरफान)*

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज महिलांचे कौटुंबिक हिसांचारापासून संरक्षण कायदा कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदारांचे म्हणणे असे की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचे लग्न दि. १२/०३/२०२० रोजी मिर्झा कॉलनी, सिल्लोड येथे थाटामाटात संपन्न झाले. अर्जदार हिच्या आई–वडीलांनी सदर विवाहाचा संपूर्ण खर्च करुन सदरचे लग्न थाटामाटात लावुन दिले आहे. तसेच अर्जदाराचे आई–वडीलांनी संपूर्ण भांडेकुंडे व इतर संसारउपयोगी वस्तु असा सुमारे रु. ३ लाखाचा ऐवज तसेच सोन्याचांदीचे दागिने आणि रक्कम रु. १ लाख वरदक्षिणा म्हणुन देऊन एकुण रक्कम रु. ४ लाख खर्च केले आहेत. सदर लग्नसंबंधातुन अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांना अर्जदार क्र. २ हा मुलगा झालेला असुन त्यांचे पती–पत्नी नातेसंबंध कायम आहेत.

**०३.** विवाहानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदण्यास गेली असता गैरअर्जदाराने तिला सुरवातीचे एक ते दोन महिने चांगले नांदवले व त्यानंतर क्षुल्लक कारणांवरुन त्रास देण्यास सुरवात केली. गैरअर्जदार हे अर्जदार हिस तुझे आई–वडीलांनी लग्नात मानपान दिला नाही, सोन्याचे दागिने जास्त दिले नाही असे म्हणुन अर्जदारास सतत टोमणे मारणे, शिवीगाळ करणे, मारहाण करणे, वेळेवर जेवण न देणे, वारंवार मारहाण करुन घरातुन बाहेर काढुन देणे, घरात कोंडुन ठेवणे इ. प्रकारे प्रचंड प्रमाणावर शारीरीक व मानसिक छळ करु लागले. तसेच अर्जदारास नांदायचे असेल तर तुझे माहेरहुन व्यवसायाकरिता रु. २ लाख घेऊन ये असे म्हणुन अर्जदारास बेकायदेशीर पैश्यांची मागणी करुन प्रचंड घरगुती व कौटुंबिक छळ व हिंसाचर करु लागले. परंतु गैरअर्जदारांच्या वागण्यात फरक पडेव व ते भविष्यात चांगले नांदवतील या आशेने अर्जदार सर्व त्रास सहन करत होती.

**०४.** अर्जदारांचे पुढे कथन की, दरम्यानचे काळात अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारापासुन गर्भवती राहिली परंतु या काळातही गैरअर्जदाराचा त्रास कमी झाला नाही. गैरअर्जदार याची बहिण अर्जदाराविरुध्द चिथावणी देऊन उलटसुलट सांगुन भडकावुन देत असे. त्यामुळे गैरअर्जदार हे सतत अर्जदाराचा प्रचंड प्रमाणावर छळ करत असे. अर्जदाराचे गर्भारपणात देखील गैरअर्जदार यांनी प्रचंड दुर्लक्ष करुन ती सात महिन्यांची गर्भवती असतांना तिला छळ करुन तिचे अंगावरील संपूर्ण स्त्रीधन हिसकावुन काढ्ुन घेऊन तिला घरातुन हाकलुन दिले. दि. ०६/०३/२०२१ रोजी अर्जदाराने मुलास जन्म दिला, परंतु सदर बाब समजल्यानंतर देखील गैरअर्जदार हे मुलास पाहायला देखील आले नाही व सदर प्रसुतीचा खर्च हा अर्जदाराचे आई–वडीलांनीच केला. दरम्यानच्या काळात अर्जदारास तिचे नातेवाईकांनी मध्यस्थी करुन दि. ०६/०६/२०२१ रोजी गैरअर्जदारांकडे नांदण्यास पाठवले परंतु गैरअर्जदारांच्या वागण्यात काहीएक फरक पडला नाही. गैरअर्जदार हे अद्रक, लसुनचा व्यवसाय वाढवण्यासाठी रु. २ लाख घ्ज्ञेऊन ये असे म्हणुन मारहाण व शिवीगाळ करु लागले. गैरअर्जदास अर्जदार व तिचे नातेवाईकांनी समजावण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा काहीएक उपयोग झाला नाही. दि. १५/०८/२०२२ रोजी रात्री १०.०० वाजता गैरअर्जदाराने त्यांचे पैश्याचे मागणीसाठी अर्जदारास मारहाण करुन व शिवीगाळ करुन घराबाहेर हाकलुन दिले. तेव्हापासुन ती तिचे माहेरी राहत आहे.

**०५.** दि. ३०/०९/२०२२ रोजी रात्री ९.०० वाजेच्या सुमारास गैरअर्जदार क्र. १ ते ९ हे अर्जदाराचे माहेरी आले व अर्जदारास तुला नांदायचे असेल तर आम्हाला लसुन व्यवसायाकरिता २ लाख रुपये दे, नाहीतर तलाक दे, आम्हाला दुसरे लग्ना करायचे आहे असे म्हणुन शिवीगाळ करुन मारहाण करु लागले. त्यानंतर अर्जदार ही पोलीस स्टेशनला गेली असता पोलीसांनी महिला समुपदेशन केंद्र तसेच न्यायालयात जाण्याचा सल्ला दिल्याने अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०६.** गैरअर्जदाराने अर्जदाराचा कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना जाणीवपूर्वक त्याग केला असुन तिचेवर दुर्लक्ष केले आहे. अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदाराने केलेल्या अत्याचारामुळे अर्जदारास दुःखी व कष्टी जीवन जगावे लागत आहे. तसेच त्यांना सतत वैद्यकीय उपचार घ्यावे लागत आहे. अर्जदार ही उदरनिर्वाह तसेच पालनपोषण करण्यास असमर्थ आहे. याऊलट गैरअर्जदार यांची परिस्थीती उत्तम असुन गैरअर्जदारांकडे मिर्झा कॉलनी, सिल्लोड येथे प्रशस्त तीन मजली घर असुन त्यापासुन

दरमहा रु. ५०,०००/– घरभाडे येते. तसेच गैरअर्जदार हे अद्रक व लसुनचे व्यापारी असुन त्यापासुन त्यांना दरहा रु. १ लाख इतके उत्पन्न मिळते. करिता अर्जदारांनी त्यांना प्रत्येकी रु. १०,०००/– दरमहा पोटगी म्हणुन देणेबाबत अंतरिम आदेश करावा अशी विनंती करण्यात आलेली आहे.

**०७.** गैरअर्जदार याने नि.क्र. ०८ वर मुख्य अर्जास लेखी म्हणणे सादर केलेले आहे. तसेच नि.क्र. १० वर पुरसीस देऊन नि.क्र. ०८ वरील लेखी खुलासा नि.क्र. ०९ साठी देखील विचारात घेण्यात यावा असे कथन केलेले आहे.

**०८.** गैरअर्जदार याने अर्जदारांसोबतचे नातेसंबंध मान्य करुन अर्जदाराचे सर्व कथन खोटे असल्याचे सांगितले. गैरअर्जदाराचे कथन की, अर्जदाराने गैरअर्जदारावर दडपण आणण्याच्या हेतुने व त्याचे कुटुंबीयास त्रास देण्याचे हेतुने न्यायालयाची दिशाभुल करुन कायदेशीर तरतुदींचा गैरफायदा घेण्याचे उद्वेशाने प्रस्तुतचा खोटा बनावट अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार ही स्वच्छ मनाने व हेतुने न्यायालयात आलेली नाही. अर्जदाराने जाणिवपूर्वक खरी वस्तुस्थिती व सत्य हकीकत न्यायालयापासुन लपवुन ठेवुन खोटे, बनावट व कपोलकल्पीत असे कथानक तयार केले आहे. गैरअर्जदाराने कधीही अर्जदाराचा त्याग केलेला नसुन उलट अर्जदारानेच गैरअर्जदाराचा कोणत्याही सबळ कारणांशिवाय त्याग केलेला आहे.

**०९.** गैरअर्जदाराचे पुढे कथन की, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह हा अत्यंत साध्या पध्दतीने झालेला असुन त्यामध्ये त्यांना कोणत्याही प्रकारच्या भेटवस्तु देण्यात आलेल्या नाहीत. उलट गैरअर्जदाराचे नातेवाईकांनीच अर्जदाराचे अंगावर सोन्याचांदीचे दागिने घातले असुन ते आजरोजी देखील अर्जदाराकडेच आहेत. अर्जदार ही लग्नानंतर गैरअर्जदारांसोबत १५ ते २० दिवस चांगली राहिली व त्यानंतर कोणतेही कारण नसतांना तिचे मनात येईल तेव्हा माहेरी येणे जाणे करण्यास सुरवात केली. त्यामुळे गैरअर्जदार व त्याचे आई–वडीलांनी तिला विनाकारण माहेरी जाऊ नये व स्थिरपणे संसार करावा अशी समज दिली असता तेव्हापासुन अर्जदार गैरअर्जदारसोबत क्षुल्लक कारणावरुन भांडण तंटे करत. तसेच अर्जदाराने 'आपण माझ्या म्हणण्याप्रमाणे मला माझ्या माहेरी जाऊ दिले नाही तर मी आत्महत्या करुन घेईल' अशी धमकी दिली. सदर धमकीला घाबरुन गैरअर्जदाराने अर्जदारास कधीही माहेरी जाण्याची मुभा दिली असता अर्जदार त्याचा गैरफायदा घेऊन मनात येईल तेव्हा माहेरी निघुन जात व दीर्घकाळ तिचे माहेरी राहत

असे, गैरअर्जदाराने बोलालवे असता देखील येत नसे. अर्जदाराने लग्न झाल्यापासुन गैरअर्जदारासोबत स्थिरपणे संसार केलेला नाही.

**१०.** गैरअर्जदाराचे पुढे कथन की, अर्जदार ही दि. २१/१२/२०२० रोजी तिचे राजीमर्जीने गैरअर्जदाराचा त्याग करुन माहेरी निघुन गेली व त्यानंतर गैरअर्जदारासोबत नांदण्यास व सुखी संसार करण्यास नकार दिला. त्यानंतर गैरअर्जदाराने त्याचे नातेवाईक व गावातील इतर प्रतिष्ठीत लोक यांना सोबत घेऊन अर्जदारास नांदविण्यास आणण्यासाठी तिचे माहेरी गेला असता अर्जदार ही नांदण्यास आली. त्यानंतर दि. ०६/०३/२०२१ रोजी अर्जदारास मुलगा झाला. गैरअर्जदार हा अत्यंत गरीब कुटुंबातील असुन तो मोलमजुरी करतो. तो स्वतःचा तसेच अर्जदारांचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे परंतु अर्जदाराने कोणतेही कारण नसतांना केवळ गैरअर्जदार हा आजारी आहे व त्यामुळे तिला पसंत नाही या कारणाने गैरअर्जदाराचा त्याग करु. दि. १५/०८/२०२१ रोजी कोणतेही सबळ कारण नसतांना घरातुन तिचे कपडेलत्ते व स्त्रीधन घेऊन स्वतःच्या राजीमर्जीने निघुन गेली आहे. गैरअर्जदाराने अर्जदारास नांदण्यास येण्याकरिता बरेच प्रयत्न केले परंतु ती नांदण्यास आली नाही. अर्जदार ही गैरअर्जदाराचे नातेवाईकांसोबत विनाकारण गैरवर्तवणुक करुन घरात कलह निर्माण करत असे. अर्जदाराने तिला समजवण्याचा प्रयत्न केला परंतु तिचे वर्तवणुकीत कोणताही फरक पडला नाही. अर्जदाराचे स्वभवात बदल होईल या आशेवर गैरअर्जदाराने तिचेसोबत संसार करण्याचा प्रयत्न केला परंतु तिचे स्वभावात काहीएक फरक पडला नाही. अर्जदार घर सोडुन गेल्यानंतर गैरअर्जदाराने दि. १५/०८/२०२१ रोजी बैठक घेऊन अर्जदाराची समजुत घलुन नांदण्यास येण्याची विनंती केली परंतु तिने 'मला तुमच्यासोबत नांदायचे नाही, मला तुमच्यापासुन फारकत हवी आहे, तुमचेसोबत राहुन मला माझे आयुष्य बरबाद करावयाचे नाही, तुम्ही मला पंधरा लाख रुपये देऊन फारकत द्या, नाहीतर मी तुमच्यावर खोट्या केसेस करुन जेलमध्ये पाठवीन' असे म्हणुन नांदण्यास येण्यास नकार दिला.

**११.** गैरअर्जदाराचे पुढे कथन की, गैरअर्जदाराने अर्जदार हिचेकडे कोणत्याही स्वरुपाचे दुर्लक्ष केलेले नाही, तिने स्वमर्जीने गैरअर्जदाराचा त्याग करुन ती तिचे माहेरी राहत आहे. अर्जदार हिचे वडीलांनी तिला वडीलोपार्जीत जमिनीत हिस्सा वाटुन दिलेला असुन राहत्या घरात देखील राहण्यासाठी दोन स्वतंत्र खोल्या दिलेल्या आहेत. त्यामध्ये अर्जदार ही शिवनकाम करुन त्यापाससुन तिला दरमहा रु. १० ते १५ हजाराचे उत्पन्न मिळते. अर्जदाराची मौजे शिवना येथे वडीलोपार्जीत ४ ते ५ एकर जमीन असुन त्यापासुन

तिला ६ ते ७ लाखाचे वार्षीक उत्पन्न मिळते. अर्जदाराने केवळ कायदेशीर तरतुदींचा गैरफायदा घेण्यासाठी प्रस्तुतचे खोटे प्रकरण दाखल केलेले आहे. याऊलट गैरअर्जदाराची परिस्थीती हालाकीची असुन त्यास उत्पन्नाचे साधन नाही. तो मिळेत त्या हातमजुरीवर काम करत असल्यामुळे अर्जदाराचे कथनाप्रमाणे पोटगी देण्यास असमर्थ आहे. शेवटी गैरअर्जदाने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**१२.** अर्जाचे अवलोकन केले. अर्जदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री. जी. एस. आरके यांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदार आणि त्यांचे विधीज्ञ श्री. एस. सी. झाल्टे यांचा वारंवार पुकारा केला असता ते उपस्थित राहिले नाही. करिता गैरअर्जदार यांचे युक्तीवादाविना प्रस्तुत अर्ज निर्णयासाठी ठेवण्यात आले. खालील मुद्दे निष्कर्षाकरीता समोर आले. त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदविण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | होय, अर्जदार क्र. १ हिस दरमहा रक्कम रु. ३,०००/- आणि अर्जदार क्र. २ यास दरमहा रक्कम रु. २,०००/- |
| २. | अंतिम आदेश | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करीताः-**

**१३.** महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायद्याचे कलम २३ प्रमाणेचा अर्ज निकाली काढत असताना तिच्यासोबत कौटुंबिक हिसांचार झाल्याचे कथन प्रथमदर्शनी घेणे आवश्यक आहे. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये गैरअर्जदाराने ती त्यांच्यासोबत संसार करत असतांना तिचा शारीरीक, मानसिक व आर्थिक छळ केल्याचे कथन केले आहे. सदर अंतरिम पोटगीचा अर्ज ठरवतांना सदर अर्जदाराचे कथन प्रथमदर्शनी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त अर्जदाराच्या कथनावरुन प्रथमदर्शनी तिचा महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायद्याचे कलम ३ मधील कौटूंबिक

हिंसाचाराच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होईल असा शारीरीक, मानसिक व आर्थिक स्वरुपाचा असल्याचे दिसून येत आहे.

**१४.** अर्जदाराने आपली मिळकत व जबाबदारी दाखविण्यासाठी तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने ***रजनेश वि. नेहा व इतर*** (क्री. अपील क्र. ७३०/२०२०) मध्ये दिलेल्या निर्देशाचे अनुपालन करण्याकरिता तिचे मिळकत व जबाबदारीबाबतचे शपथपत्र दाखल केले आहे. याऊलट गैरअर्जदारास सदरचे मिळकत व जबाबदारीबाबतचे शपथपत्र दाखल करण्याचे निर्देशीत करुन देखील गैरअर्जदाराने त्याचे शपथपत्र दाखल केलेले नाही.

**१५.** अर्जदाराने तिचे अर्जामध्ये गैरअर्जदारास त्याचे लसुन–अद्रक व्यवसायापासुन दरमहा रु. १,००,०००/– उत्पन्न मिळत असल्याचे तसेच घराभाड्यातुन दरमहा रक्कम रु. ५०,०००/– इतके उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. परंतु अर्जदाराने त्याबाबत कुठलाही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. अर्जदार ही गैरअर्जदाराच्या व्यवसायाबद्दल किंवा मिळकतीबद्दल आवश्यक तो पुरावा अभिलेखावर आणु शकली असती परंतु तिने सदर पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. परंतु अर्जदाराच्या पुराव्यावरुन गैरअर्जदार हा सक्षम शरीरयष्टीचा असल्याचे स्पष्ट होत आहे. गैरअर्जदार याची सक्षम शरीरयष्टी पाहता गैरअर्जदार हा मेहनतीचे काम करुन उदरनिर्वाह भागविण्यापुरते उत्पन्न कमावू शकतो असा निष्कर्ष काढणे चूकीचे होणार नाही. तसेच गैरअर्जदार वर इतरांची जबाबदारी असल्याचे अभिलेखावर काहीही आले नाही.

**१६.** पोटगीची रक्कम ठरविताना ती अल्पहिन नसावी, तसेच भोगविलासी जीवन व्यथित करण्याइतपत ही नसावी. त्यामुळे गैरअर्जदार याच्या उत्पन्नाचा स्त्रोत लक्षात घेता, त्याच्या स्वतःच्या आर्थिक गरजा, तसेच अर्जदारांची अन्न, औषध व वस्त्राकरीताची आवश्यकता लक्षात घेता अर्जदार क्र. १ ला दरमहा रक्कम रुपये ३,०००/– आणि अर्जदार क्र. २ यास दरमहा रक्कम रु. २,०००/–, तात्पुरती पोटगी म्हणुन प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून मंजूर करणे न्यायोचित आहे. म्हणुन मुद्दा क्र. १ ला होकारार्थी उत्तर नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ ला उत्तर म्हणून खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.

२. गैरअर्जदाराने अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार क्र. १ ला दरमहा रक्कम रुपये ३,०००/- आणि अर्जदार क्र. २ ला दरमहा रक्कम रु. २,०००/- इतकी रक्कम प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि. ०३/१०/२०२२ पासुन पुढील आदेश होईपर्यंत नियमितपणे दर महिन्याच्या ५ तारखेच्या आत द्यावी.

Digitally signed by KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Date: 2026.06.04 15:57:39 +0530

(कैलास त्र्यं. अढायके)
दि. ०४/०६/२०२६
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र. १), सिल्लोड.